# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३

## (सकाळी १०-३० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर –**

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) – [अनुक्रमांक (१)] –**

(१) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महामुंबई सेझसाठी रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, पनवेल तालुक्यामधील एकूण ४५ गावांच्या जमिनी सेझसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाकडून सन २००५ पासून राबविण्यास सुरूवात करण्यात येणे, महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतकरी अधिनियम १९४८ चे कलम ६३ (१) अ मधील तरतूदीनुसार ज्या औद्योगिक कारणासाठी भूसंपादन केलेल्या जमिनींचा वापर जमिन खरेदी केलेल्या तारखेपासून पंधरा वर्षाचे आत विकासक कंपनीने सुरू केला नाही तर अशा सर्व जमिनी मूळ किंमतीस मूळ शेतकऱ्यांना परत करण्याचा कायदा या सेझमध्ये विक्री झालेल्या जमिनींनाही लागू असणे, त्यानुसार महामुंबई सेझसाठी संपादीत करण्यात आलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना परत करण्याची आवश्यकता असणे, महामुंबई सेझसाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना तीन महिन्याच्या आत परत करण्यात येणार असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी तत्कालीन उद्योग मंत्री

अग्रिम प्रत

यांनी विधीमंडळात या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आश्वासन दिलेले असणे, मात्र अद्यापपर्यंत सदर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत करण्यात आलेल्या नसणे, त्या परत करण्याची आवश्यकता असणे, विधीमंडळात घेतलेल्या निर्णयामुळे तसेच दिलेल्या आश्वासनामुळे पेण तालुक्यातील २४ गावांसह उरण, पनवेल तालुक्यामधील सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत मिळण्याच्या आशा त्यावेळी पल्लवित झाल्या असणे, राज्याच्या विधीमंडळाचा शब्द पडू न देता विधीमंडळाचे पावित्र्य राखण्याकरता सेझसाठी पंधरा वर्षापूर्वी शासनामार्फत संपादीत करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांना पूर्ववत परत केल्या जातील असा विश्वास शेतकऱ्यांना त्यावेळी झालेला असणे, मुळातच पेण तालुक्यातील संपादित झालेल्या २४ गावांच्या जमिनीपैकी २२ गावच्या जमिनी हटवणे, धरणाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट असलेल्या जमिनी ह्या सुपिक जमिनी असणे, या सुपिक व लाभक्षेत्रात समाविष्ट असलेल्या शेतजमिनी भूसंपादनात आणून अक्षम्य अशी चुक त्यावेळी प्रशासनाची झालेली असणे, सन २०१२-१३ मध्ये पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर शेतकऱ्याचे नाव कमी करून महामुंबई सेझ कंपनीचे भोगवटदार सदरी नाव दाखल करण्यात आले त्या फेरफारला जवळ जवळ सर्वच शेतकऱ्यांनी विरोध दर्शविणे व त्या विरोधात पेण तहसिलदारांकडे अपिल दाखल करणे, सदर अपिलांपैकी अनेक अपिल फेटाळणे तर सुमारे १५० शेतकऱ्यांचे अपिल मान्य करून शेतकऱ्यांचे नाव कमी न होता ७/१२ वर इतर अधिकारात महामुंबई सेझचा घेतलेल्या रकमेचा बोजा ठेवण्याचा निर्णय झाला त्या प्रमाणे सुमारे १५० शेतकऱ्यांचे तसे ७/१२ तयार करण्यात येणे, त्या प्रमाणेच उर्वरित सर्व शेतकऱ्यांच्या ७/१२ वरून भोगवटदार सदरील महामुंबई सेझ कंपनीचे नाव कमी करून महामुंबई सेझ कंपनीचा बोजा इतर अधिकारात ७/१२ ला ठेवण्यात येणे, दिनांक २१ मार्च २०२२ रोजी तत्कालीन उद्योग मंत्री यांनी शेतकऱ्यांच्या शेत जमिनी तीन महिन्यात परत करणार असल्याचे आश्वासन देऊन सुध्दा अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळालेल्या नसणे, त्यामुळे सद्यःपरिस्थितीत काही शेतकरी महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतकरी अधिनियम, १९८४ चे कलम ६३ (१-अ) या कायद्याचा आधार घेऊन कायदेशीर मार्गाने जमिनी मिळवण्याचा प्रयत्न करत असणे, या सर्व घडामोडी प्रकरणात या संपादन प्रक्रियेमुळे मागील पंधरा वर्षात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असणे व जमिनी परत मिळविण्यासाठी आजही मोठा मनस्ताप व आर्थिक नुकसान शेतकऱ्यांचे होत असणे, सदर सेझसाठी भूसंपादीत झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी पूर्ववत परत करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सबब सदर प्रकरणी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ व बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

(२) **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे वांद्रे, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील खार-सांताक्रुज येथील केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागेवर ५० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टी धारकांचा पुनर्विकास रखडलेला असणे, याबाबत विविध आयुधांद्वारे लक्ष वेधून देखील कार्यवाही होत नसणे, सदर जागेबाबत संरक्षण मंत्री भारत सरकार व मा. मुख्यमंत्री यांच्यात २०१७ साली झालेल्या बैठकीत ५०% जागा केंद्र सरकारच्या संरक्षण विभागास तर ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत तेथील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करण्याचे प्राथमिक धोरण निश्चित झालेले असणे, तसेच सदर पुनर्विकासाठी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाची बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यास हरकत नसणे, तत्कालीन सरकारने याबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत न करणे परंतु सदर झोपडपट्टीच्या लगत असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील तसेच खाजगी मालकीच्या जागेवर पुनर्विकास करण्यास मंजुरी देणे, परंतु संरक्षण विभागाच्या मालकीवरील पुनर्विकासाबाबत आजतागायत अतिशय संथगतीने सुरु असलेल्या कार्यवाहीमुळे तेथील नागरिकांमध्ये असलेल्या असंतोषाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची भूमिका."

**(बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३) व (४) ] —**

(३) **सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील दहिसर मध्ये सुरू असलेल्या अग्निशमन दलातील अग्निशामकांच्या भरती प्रक्रियेदरम्यान महिला अग्निशामक पदासाठी १६२ इंच उंचीच्या निकषात बसत असतानाही अनेक महिलांना डावलण्यात आल्यामुळे संतप्त झालेल्या आणि आंदोलनाचा पवित्रा घेतलेल्या महिला उमेदवारांवर बंदोबस्तासाठी ठेवण्यात आलेल्या पोलिसांनी सौम्य लाठीमार केला असल्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, मुंबईतील अग्निशमन दलात ९०० जागांची भरती प्रक्रिया सुरु झाली असणे, दहिसर येथे भरतीसाठीच केंद्र उभारण्यात येणे, या ठिकाणी भरतीसाठी महिला उमेदवारांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळलेली असणे, अयोग्य नियोजनाचा फटका महिला उमेदवारांना बसणे, सदरहू भरती प्रक्रीयेकरीता मुलींसाठी १६२ सेमी उंचीची अट

अस्वाक्षरित प्रत

असणे, तरीदेखील १६२ सेंमी उंची पेक्षा जास्त उंची असलेल्या मुलींना सुद्धा भरती प्रक्रियेतून बाहेर काढण्यात येणे, परंतु १६२ सेमी पेक्षा कमी उंचीच्या मुलींना पात्र ठरवण्यात येणे, तसेच उशिरा आलेल्या काही मुलींना टोकन देऊन दुसऱ्या दिवशी बोलावण्यात येणे, परंतु दिलेल्या वेळेवर पोहोचून सुद्धा त्यांना भरती प्रक्रियेत प्रवेश न देण्यात येणे, त्यामुळे नाराज झालेल्या महिला उमेदवारांनी घेतलेला आंदोलनाचा आक्रमक पवित्रा आणि आंदोलनकर्त्या असहाय्य महिला उमेदवारांवर पोलिसांनी केलेला सौम्य लाठीमार, परिणामी सदरहू ठिकाणी अग्निशमन भरती प्रक्रियेसाठी जमलेल्या सर्व महिला उमेदवारांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू भरती प्रक्रियेस तात्काळ स्थगिती देऊन झालेल्या अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **डॉ.प्रज्ञा सातव,** सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंगोली जिल्हयात मोठया प्रमाणावर अवैध देशी-विदेशी दारुच्या व्यवसाय फोफावला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास येणे, येथील अवैध दारुविक्रीमुळे ग्रामीण भागात तंटे वाढत असणे, परिणामी गावस्तरावरील वातावरण दुषित बनत असणे, यातून गुन्हेगारी वाढत असणे, परंतू बीटस्तरावरील काही कर्मचारी वरिष्ठांच्या डोळयात धुळफेक करुन अवैध दारुविक्रीला संमती देत असल्याचे येथे चित्र असणे, ग्रामीण भागात विना नंबर दुचाकीवर देशी-विदेशी दारुचा थेट द्वारपोच पुरवठा केला जाणे, परंतू प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे येथील चिंचोली महादेवसह अनेक गावांतील महिला गावांत दारुबंदी करावी अशी आग्रही मागणी करीत असणे, मात्र त्यांच्यावरच प्रशासन खोटे गुन्हे दाखल करीत असणे, त्यामुळे शासनाने माहिती घेऊन येथील अवैध देशी-विदेशी दारुविक्रीला रोखून संबंधित विक्रेते व प्रशासनातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी सर्वच स्तरावरुन मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगांव येथील एम.आय.डी.सी मधील रेमंड लिमिटेड जळगांव या

अस्वीकृत प्रत

कंपनीमधील कामगारांचा वेतनवाढीचा करारनामा करण्यास मागील दोन वर्षांपासून कंपनीचे व्यवस्थापन टाळाटाळ करीत असल्याने कामगारांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी काम बंद आंदोलन करणे, वेतनवाढीसाठी शांततामय मार्गाने कंपनीच्या आवारात ठिय्या आंदोलन करणाऱ्या कामगारांवर दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री ११.३० चे सुमारास २०० ते २५० पोलिसांनी बेकायदेशीरपणे कंपनीमध्ये घुसुन पूर्वसूचना न देता केलेला लाठीचार्ज व मारहाण, कंपनीमध्ये एकही महिला कामगार नसताना ५० महिला पोलिसांना कंपनीमध्ये आणून कामबंद आंदोलन पोलिसांनी बंद पाडणे, त्याच्या निषेधार्थ कामगारांनी कामबंद आंदोलन करणे, ३,००० कामगारांचा निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, परिणामी कामगारांत पसरलेला तीव्र असंतोष व भितीचे वातावरण, या संपूर्ण घटनेची चौकशी होऊन दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन कंपनी पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.गोपिचंद पडळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यभरातील कोणत्याही खातेदार शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास स्व.गोपीनाथ मुंडे अपघाती विमा योजनेतून दोन लाख रुपयांची मदत देणे अपेक्षित असणे, असे असतानाही विमा कंपन्यांकडून अनेक प्रस्ताव नाकारले जात असल्याची बाब उस्मानाबाद जिल्ह्यात माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, या योजनेसाठी शासनाने ९५ कोटीहून अधिक खर्च विमा कंपनी व सल्लागारावर करीत असताना ही कंपनी शेतकऱ्यांचे प्रस्ताव नाकारत असणे, शेतकऱ्यांचे सर्व प्रस्ताव मान्य करून त्यांना न्याय देण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : उप मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २३० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी"

अग्रिम प्रत

**आठ सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा – (पहिला दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री.

**२)** उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री.

**३)** आदिवासी विकास मंत्री.

**४)** ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री.

**५)** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री.

**६)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

**७)** शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री.

**८)** सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री.

**९)** पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री.

**नऊ : शासकीय विधेयके –**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

अप्रकाशित प्रत

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**दहा** : **(क)** **सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, विलास पोतनीस, विक्रम काळे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, अमोल मिटकरी, राजेश राठोड, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, वजाहत मिर्झा, अनिकेत तटकरे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, धिरज लिंगाडे, कपिल पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास) टप्पा-२ मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेल्या निधीमधून १ टक्काही रक्कम राज्याने खर्च केली नसल्यामुळे संपूर्ण रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, शासकीय सेवकांच्या बदल्यांबाबतचा सुस्पष्ट कायदा असताना कृषी मंत्री यांनी वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात स्वतंत्र आदेश काढणे, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजना निधीसारख्या योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात लक्षणीय घट होऊन त्याचा कृषी उत्पादनावरही विपरीत परिणाम होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना तुषार आणि ठिबक सिंचनासाठी असलेले अनुदान वाटप अनेक शेतकऱ्यांना झालेले नसणे, "ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क" या संस्थेने हवामान बदलाचा धोका असलेल्या देशातील प्रसिध्द केलेल्या १०० राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचाही समावेश असणे, सदरहू धोका लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती गठीत करण्याची आवश्यकता, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, खते, कीटकनाशके, तणनाशके, बियाणे यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असणे, ज्वारीवर

मावा तसेच तुडतुडे (डेल्फसीड) रोगाचा प्रादुर्भाव झाला असणे, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून ठोस तरतूद करण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, सदरहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरकारकडून शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे पीक कर्ज देण्यासाठी बँक जाणीवपुर्वक विलंब करीत असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थाच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांपुढे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदी अभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, नाफेड मार्फत कांदा खरेदी निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता तसेच राज्यसरकारने स्वतःच्या तिजोरीतून भावांतर योजना सुरु करण्याची आवश्यकता, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याच्या हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणा पूर्णपणे अपयशी ठरणे, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाकडून सातत्याने शेतकऱ्यांची वीज तोडली जात असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच ज्या गावांतून थकीत बिलाची रक्कम वसूल केली जाते त्या गावाच्या विकासकामांसाठी एकूण वसूल केलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कम विद्युत महामंडळाकडून देणे आवश्यक असताना त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच साहित्यांचा होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वीज जोडणी साठी होत असलेला विलंब, सिंगल फेजची नागरीकांकडून मोठ्याप्रमाणात मागणी होत असून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच जुन्या डी.पी मुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे नुकसान झालेले असणे, तसेच जनावरांचा देखील मृत्यू झाला असणे, उक्त नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून नागरीकांना अजून कोणतीही मदत मिळाली नसणे, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रोजगार हमी योजना राबविण्यासाठी कडक निर्णय

अप्रकाशित प्रत

घेण्यात आल्यामुळे रस्ते दुरुस्ती करण्याच्या कामामध्ये अडचणी येत असने, त्यामुळे उक्त योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर ग्रामसेवकांनी बहिष्कार घातला असणे, तसेच मनरेगा योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य पिछाडीवर गेला असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ व बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** सुरेश धस, प्रा.राम शिंदे, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, रामदास आंबटकर, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण पोटे-पाटील, वसंत खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना दिरंगाई करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही मागील सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे परंतू, त्याच वेळेस महायुती सरकारने माहे जून, २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी

मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे परंतू, मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणाऱ्या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे परंतू, महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी आघाडी सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे परंतु, महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे परंतु, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्ह्या-जिल्ह्यांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) सर्वश्री शशिकांत शिंदे,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"सातारा तालुक्यातील एमआयडीसी येथे मे. मुथा इंजिनिअरींग प्रा.लि. सातारा यांचे पाच कारखाने असून या कारखान्यात १२५० कंत्राटी कामगार वर्षानूवर्षे काम करीत असणे, या कामगारांना तुटपूंज्या वेतनावर काम करावे लागत असून कामगार कायद्यानूसार देय असलेल्या सोयी-सुविधा, बोनस व ग्रॅच्यूईटी सुध्दा देण्यात येत नसणे, या कामगारांना कामगार कायद्यानूसार देय असलेल्या सोयी-सुविधा देण्याबाबत तेथील कामगार संघटनेच्या वतीने दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. कामगार मंत्री यांना लेखी पत्राद्वारे विनंती करण्यात आली असणे, मे. मुथा इंजिनिअरींग प्रा.लि., एच-२१, एम.आय.डी.सी., सातारा या आस्थापनेमध्ये सरकारी कामगार अधिकारी, सातारा यांनी सदर आस्थापनेमध्ये विविध कामगार कायद्यांतर्गत निरिक्षण शेरे पारीत केले असून सदर निरिक्षण शेऱ्यात आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने सुरु असलेली कार्यवाही पूर्ण करुन कंत्राटी कामगारांना सोयी-सुविधा देण्याची आवश्यकता असणे, कामगारांना बोनस व ग्रॅच्यूईटी देण्याची कामगारांची मागणी प्रलंबित आहे त्यावर त्वरीत निर्णय घेऊन न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री सुनिल शिंदे**, विलास पोतनीस, ॲड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"बी.डी.डी. चाळ प्रकल्प हा म्हाडामार्फत राबविण्यात येणारा देशातील सर्वात मोठा नागरी पुनरुत्थान प्रकल्प असतानाही प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरु असणे, या पुनर्वसन प्रकल्पात एकूण १९५ बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास होणार असून सुमारे १५५९३ सदनिका उपलब्ध होणार असणे, परंतु सदरहू प्रकल्पाच्या कामाच्या संथ गतीमुळे प्रकल्पाचे काम निर्धारित करण्यात आलेल्या ५ वर्षात पूर्ण होण्याबाबत रहिवाशांच्या मनात निर्माण झालेली साशंकता, बी.डी.डी. चाळ प्रकल्पातील अनेक रहिवाशांच्या पात्रतेची प्रकरणे प्रलंबित असून सदरहू प्रकरणे तातडीने मार्गी लावण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याची असलेली नितांत आवश्यकता, वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाचे काम सुरु झाले असले, तरी नायगाव येथील बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे काम प्रलंबित असणे, त्यामुळे येथील रहिवाशांमध्ये शासनाप्रती वाढत असलेली नाराजीची भावना, वरळी आणि नायगाव येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागलेला असताना केंद्र शासनाने नकार दिल्याने शिवडी येथील मुंबई पोर्ट

ट्रस्टच्या जागेवरील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासात निर्माण झालेला अडसर, बी.डी.डी. चाळ पुनर्वसनातील पात्र रहीवाशांसाठी वितरीत करण्यात येणाऱ्या सेंच्युरी मिल संक्रमण शिबिरातील सदनिका एमएमआरडीए प्रकल्प बाधितांना देण्याबाबत प्रशासनाने घाट घातल्याने बी.डी.डी. चाळ रहिवाशांत पसरलेली संतापाची लाट, बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

असुधारित प्रत